## रे.मु.नं.९६/१४ मधील नि.क.२८ वरील आदेश

**कृष्णा घरत, वगैरे** ... **वादी**
**वि.**
**नामदेव घरत, वगैरे** ... **प्रतिवादी**

१. प्रतिवादी क्र. १ ते १० तर्फे प्रस्तुत अर्ज हा कैफियत दाखल करण्यास जो ११५ दिवसांचा विलंब झाला आहे तो माफ करुन कैफियत दाखल करण्यास परवानगी मिळणेकरीता दाखल केला आहे. सदर अर्जावर वादींनी दाखल केलेले म्हणणे वाचले.

२. प्रतिवादी क्र. १ ते १० तर्फे विधिज्ञांनी असा युक्तीवाद केला की, प्रतिवादी क्र. १ ते १० यांना दाव्यात हजर झाल्यानंतर त्यांना वेळेत कागदपत्रे न मिळाल्यामुळे व रायगड जिल्हा परिषदेच्या नवघर विभागाची निवडणूक जाहिर झाल्यामुळे तलाठी यांनी सातबारा उतारे व फेरफार देण्यास वेळ घालविला. त्यामुळे त्यांना कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करुन कैफियत दाखल करण्याची परवानगी देण्यात यावी. वादींतर्फे वकीलांनी असा युक्तीवाद केला आहे की, प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी जाणूनबुजून वेळेत कैफियत दाखल केली नाही. त्यामुळे वादींना न्यायदान मिळण्यास मुद्दाम विलंब केलेला असून त्याचे योग्य ते स्पष्टीकरण दिलेले नाही. प्रतिवादी क्र. १ ते १० यांच्या अर्जातील कारण संयुक्तीक नाही. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करावा.

३. न्यायालयीन अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत दावा हा जाहिर ठरावाकरीता व निरंतर मनाई हुकूमाकरीता वादींनी दाखल केलेला असुन तो स्थावर मिळकतीसंदर्भात आहे. प्रतिवादी क्र. १ ते १० हे सदर प्रकरणात त्यांची कैफियत दाखल करून दाव्यास विरोध करणार असल्याचे दिसुन येते. त्यामुळे

अर्जातील कारणे विचारात घेता त्यांना त्यांची बाजू मांडण्याची संधी मिळावी, प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढता यावे व प्रकरणांची वाढती संख्या टाळण्याकरीता प्रतिवादी क्र. १ ते १० यांना कायद्यानुसार समान संधी देणे योग्य व संयुक्तीक आहे. त्यामुळे वरील बाबींचा परिस्थितीचा व अर्जातील कारणांचा विचार करता खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात आला आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | प्रतिवादी क्र. १ ते १० यांचा अर्ज (नि.क्र. २८) रक्कम रु.२०००/- च्या खर्चासह मंजूर करणेत येत आहे. |
| २. | प्रतिवादी क्र. १ ते १० यांनी खर्चाच्या रक्कमेपैकी रक्कम रु.५००/- ही विधी सेवा समिती, उरण यांचेकडे जमा करावी व उर्वरित रक्कम रु.१,५००/- ही वादींना दयावी. |

उरण.
दिनांक : १५/१०/२०१८

( प्रि.म.पाटील )
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, उरण.